# प्रेसनोट दिनांक २५/११/२०१७

**घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार सिंहगड रोड पोलीसांकडुन जेरबंद. घरफोडीच्या एकुण १२ गुन्हयांची उकल, ७८९ ग्रॅम सोन्याचे दागिणे व रोख रक्कम २५०००/- असा एकुण २४ लाख रुपयांचा मुद्येमाल हस्तगत करुन गुन्हे उघडकीस आणले.**

---

सिंहगड रोड पोलीस स्टेशन भागात गेल्या काही दिवसांपासुन दिवसा व रात्रीच्या घरफोडयांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली होती. सदर पार्श्वभुमीवर सिंहगड रोड पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी घरफोडी झालेल्या ठिकाणांचे आजुबाजुचे परीसरातील सीसीटीव्ही फुटेज संकलीत करुन त्याचा अभ्यास करुन त्यातुन पायी चालत येवुन घरफोडया करणा-या संशयीत आरोपीस निश्चीत केले. तसेच सलग ०७ दिवस कसोशीने प्रयत्न करुन नमुद संशयीत आरोपीचा ठावठिकाणा निश्चीत करुन आरोपी नामे सुनिल उर्फ सुशिल बबन भोसले, वय २७, रा गल्ली नं. २ राम मंदिराचे बाजुला, राम नगर, पेरणेफाटा, भिमा कोरेगाव ता हवेली जि पुणे, मुळगाव पखराबाज धानोरे, ता जामखेड जि अहमदनगर यास दिनांक २३/११/२०१७ रोजी १८.०० वाजता अटक केली आहे. नमुद आरोपी याच्याकडे कसोशीने तपास करुन त्याच्याकडुन **सिंहगड पो स्टे हददीत एकुण १२ घरफोडया उघडकीस आणुन त्याचे ताब्यातुन ७८९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे व रोख रुपये २५,०००/- असा एकुण २४,००,००० (अक्षरी चोवीस लाख रुपये) रुपयांचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आलेला आहे**. सदर आरोपी हा घरफोडी करण्याचे वेळी राहते पत्यावरुन बस व्दारे कात्रज या ठिकाणी उतरत असे व पायी फिरुन सोबत असलेल्या पोपट पकड व कटावणीच्या सहाय्याने बंद घरांचे कुलुप कोयंडा तोडुन घरफोडी करत असे. यातील आरोपी सुनिल उर्फ सुशिल बबन भोसले यांचेवर यापुर्वी घरफोडीचे १० गुन्हे हे कोथरुड, निगडी, चिंचवड, येरवडा, विश्रांतवाडी, निगडी या भागात दाखल आहेत.

**सदरची कामगिरी श्री रविंद्र सेनगावकर, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, डॉ प्रविण मुंढे, मा.पोलीस उपआयुक्त, परीमंडळ -२, डॉ शिवाजी पवार,सहा पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, श्री.विष्णु जगताप,वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री बबन खोडदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.गिरीष सोनवणे,पोलीस कर्मचारी यशवंत ओंबासे, दयानंद तेलंगे पाटील, दत्ता सोनवणे, संतोष सावंत, सचिन माळवे, राहुल शेडगे, वामन जाधव, शिवा कायगुडे ,पुरषोत्तम गुन्ला व मयुर शिंदे यांचे पथकाने केली आहे.**